
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | मंगळवार, 31 मार्च 2026 | अंक क्र. 311 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# प्रभू श्रीरामांच्या तत्त्वावर पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाचा कारभार : नवनाथ बन

## सरकारचे योजना सर्वसामान्यापर्यत पोहचवणे ही आपली जबाबदारी : आ.सुरेश धस
## आष्टी व कडा मंडळाच्यावतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान मोठ्या उत्साहात संपन्न

■ आष्टी (प्रतिनिधी)





कडा येथे आष्टी व कडा मंडळाच्या वतीने आयोजित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान 2026' या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा सांगता समारंभ उत्साहात पार पडला. या वेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते तथा मुंबई महानगरपालिकेचे सदस्य नवनाथ बन यांनी प्रमुख मार्गदर्शन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा गौरव करत, प्रभू श्रीरामचंद्रांच्या तत्त्वांवर आधारित शासनपद्धती देशात राबवली जात असल्याचे प्रतिपादन केले.

नवनाथ बन आपल्या विस्तृत भाषणात म्हणाले की, प्रभू श्रीरामचंद्र हे राजघराण्यात जन्मले तरी त्यांनी जनतेच्या कल्याणासाठी वनवास स्वीकारला आणि त्या कठीण परिस्थितीतही त्यांनी आदर्श, कर्तव्यनिष्ठा आणि संयम यांचे पालन केले. त्यामुळेच त्यांना 'मर्यादा पुरुषोत्तम' ही उपाधी प्राप्त झाली.

त्याचप्रमाणे भारतीय जनता पार्टी नेही अनेक वर्षे सत्तेबाहेर राहून संघर्षाचा काळ अनुभवला. या 'वनवासातून' बाहेर पडलेले प्रभावी नेतृत्व म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी असून त्यांनी देशाला स्थैर्य, विकास आणि सुरक्षिततेची नवी दिशा दिली आहे.

ते पुढे म्हणाले की, भारतीय जनता पार्टीच्या विचारांची पायाभरणी करताना अनेक पिढ्यांनी त्याग केला. अटल बिहारी वाजपेयी, लाल कृष्ण अडवाणी,मुरली मनोहर जोशी, यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांनी पक्षाची विचारधारा देशभर पोहोचवली. आज त्याच विचारांच्या बळावर पक्ष देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने जागतिक स्तरावर आपले स्थान अधिक बळकट केले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिमा उंचावली असून अनेक देश भारताकडे आदराने पाहत आहेत. गरीब, वंचित, शोषित, दलित व आदिवासी घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजना राबवण्यात आल्या आहेत. घरकुल, आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा, डिजिटल सेवा या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली असून सामान्य नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडत आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रातील राजकारणावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासकामांना वेग आला असून जनतेने त्यांना पुन्हा एकदा संधी दिली आहे. कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी अधिक सक्रिय राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस होते. तसेच व्यासपीठावर भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश सोशल मीडिया सेलचे प्रदेशाध्यक्ष प्रकाशजी गाडे, भाजप सोशल मीडिया सेल प्रदेश कार्यकारिणी सदस्य दत्ताजी महाजन, हिंदुत्ववादी कार्यकर्ते व ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पवन मोगरेकर, आष्टी विधानसभा प्रमुख गणेश नाना शिंदे, सामाजिक कार्यकर्ते माऊली जरांगे, कडा मंडळ अध्यक्ष अनिल ढोबळे, आष्टी मंडळ अध्यक्ष रमेश गावडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोपात आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, 2014 ते 2019 या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या विकासकामांमुळेच जनतेने युतीला मोठा पाठिंबा दिला होता. त्यांच्या कार्याची हीच खरी पावती होती. मात्र त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी वेगळी राजकीय भूमिका घेतल्यामुळे परिस्थिती बदलली. तरीही देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षात राहूनही आपले नेतृत्व सिद्ध केले आणि 'मी पुन्हा येईन' या शब्दाला खरे ठरवत पुन्हा सत्तेत येऊन कामगिरी केली.सरकारने देखील अनेक योजना राबविल्या असून सरकारचे योजना सर्वसामान्यापर्यत पोहचवणे ही आपली जबाबदारी असल्याचे प्रतिपादन आ.सुरेश धस असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित कार्यकर्त्यांचा उत्साह, शिस्तबद्धता आणि संघटनाबद्दलची निष्ठा विशेषत्वाने जाणवली. या सहा दिवसीय प्रशिक्षण महाअभियानात तालुक्यातील पदाधिकारी, बूथप्रमुख, शक्तिकेंद्रप्रमुख, महिला पदाधिकारी, युवा कार्यकर्ते आणि विविध आघाड्यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. शेवटी आयोजकांच्या वतीने सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## जिप सभापती सौ. शिवकन्या गोडभरले यांचे आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

■ लातूर प्रतिनिधी

लातूर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापतीपदी भाजपाच्या सौ. शिवकन्याताई महेंद्र गोडभरले यांची बिनविरोध निवड झाली असून या निवडीबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर तालुक्यातील खरोळा जिल्हा परिषद गटातून बहुमताने विजयी झालेल्या भाजपाच्या सौ. शिवकन्याताई महेंद्र गोडभरले यांची लातूर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी बिनविरोध निवड झाली. निवड जाहीर झाल्यानंतर भाजपाच्या संवाद कार्यालयासमोर फटाके फोडून नूतन सभापती शिवकन्याताई गोडभरले यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी नूतन सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले यांचा यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अंगणवाडीसह महिलांचे व इतर प्रश्नाची निश्चितपणे सोडवणूक होईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिप सदस्य महादेव साळुंखे, सौ. छायाताई पद्माकर चिंचोलकर, महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, सुरज शिंदे, अनिल भिसे, राजकिरण साठे, प्रताप राऊतराव, सुरेंद्र गोडभरले, लक्ष्मण यादव, निवृत्ती चिद्रे, सुधाकर काळे, रमाकांत फुलारी, चंद्रकांत कातळे, संतोष चव्हाण, रुपेश काळे, अशोक सावंत, राजू मानमोडे, शुभम खोसे, वैभव मगर, बालाजी गवळी, नारायण राठोड, पुरी महाराज, बालाजी मानमोडे, दिलीप पाटील, प्रशांत रायनूळे यांच्यासह अनेकांनी नवनिर्वाचित सभापती सौ. शिवकन्याताई महेंद्र गोडभरले यांचे अभिनंदन केले.



## शेतीप्रश्नी किसान सभेचा बीडला धडक मोर्चा : डॉ.अजित नवले शेतीप्रश्नी बीडमध्ये

■ बीड / प्रतिनिधी



पीकविमा, अतिवृष्टी अनुदान, गाळप केलेल्या ऊसाचे देयक आणि अतिवृष्टीत मृत्युमुखी पडलेले पशुधन नुकसान भरपाई या प्रश्नाला घेत अखिल भारतीय किसान सभा बीड बुधवार दि 1 रोजी कलेक्टर कचेरीवर राज्य सचिव डॉ.अजित नवले यांच्या नेतृत्वाखाली धडक मोर्चा काढणार असल्याची माहिती किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉ.ॲड.अजय बुरांडे यांनी दिली.

सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अभूतपूर्व अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील खरिप पीक मोठ्या प्रमाणात वाहून गेले, जमिनी खराडल्या गेल्या या प्रश्नी किसान सभेने जिल्हाधिकारी कार्यालय, आयुक्त कार्यालयावर मोर्चे काढले. या प्रश्नी साडेआठ हजार रुपये प्रति हेक्टर अनुदान व रब्बी पिकांसाठी तीन हेक्टर मर्यादे पर्यंत प्रती हेक्टर दहा हजार रुपये अनुदान तर वाहून, खरडून गेलेल्या जमिनीसाठी रोजगार हमीच्या माध्यमातून मदत, पिकविमा धारक शेतकऱ्यांना झालेल्या पिकाचे नुकसान प्रति हेक्टर किमान साडेसतरा हजार रुपये प्रमाणे पिक विम्यातून देण्याची घोषणा केली.

या सर्व परिस्थितीत वर्ष संपले तरी पिक विमाधारक सर्व शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीच्या प्रमाणात १७५०० रु. पेक्षा जास्त अथवा अतिवृष्टी नुकसानाच धरतीवर घोषित केल्याप्रमाणे किमान १७५०० रुपये सरसकट पिकविमा मिळावा, शासनाने घोषित केलेले अतिवृष्टी अनुदान सर्व वंचित शेतकऱ्यांना १५ दिवसांच्या आत सर्व अडचणींचे निराकरण करून मिळायलाच हवे, मागच्या तीन-चार महिन्यापासून जिल्ह्यातील विविध कारखान्यांनी गाळप केलेल्या उसाचे पैसे शेतकऱ्यांना दिलेले नाही ही ऊस बिलाची रक्कम पुढच्या आठ दिवसाच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी, अतिवृष्टीमुळे वाहून गेलेल्या पशुधनाची नुकसान भरपाई मिळणे अजून बाकी आहे. त्यासाठी शासनाने अशा शेतकऱ्यांना घोषित केलेली मदत १० एप्रिल पर्यंत वितरित करावी.या मागण्या घेत जिल्ह्यातील शेतकरी अखिल भारतीय किसान सभेच्या नेतृत्वाखाली बुधवार १ एप्रिल २०२६ रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर किसान सभेचे राज्य सचिव कॉ.डॉ.अजित नवले यांच्या नेतृत्वाखाली धडक मोर्चा काढणार असून या मोर्चात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सामील व्हावे असे आवाहन बीड किसान सभेने केले आहे.


## भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांची प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

### बीड जिल्ह्यातील विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करीन : भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन

■ आष्टी (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार मित्र कधी काळी आम्ही सोबत पत्रकारिता करत होतो आणि आज पुन्हा एकदा बीड जिल्ह्याच्या त्या आठवणींना उजाळा मिळाला. वेगवेगळ्या बातम्या करण्याच्या निमित्ताने आष्टीला देखील येणं व्हायचं. कड्याला आज आ. सुरेश धस यांच्या कार्यक्रमाने निमित्ताने येणं झालं.आपल्या सगळ्यांची भेट झाली. खरंच आनंद झाला. बीड जिल्हा हा मागास वंचित किंवा एकूण विकासापासून वंचित आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस झाले तेव्हापासून बीड जिल्ह्यावर विशेष लक्ष देऊन आहेत. या बीड जिल्ह्याला देण्याचा काम देवेंद्रजींच्या नेतृत्वात चालल आहे. वेगवेगळे रस्ते महामार्ग असतील ते आता बीड जिल्ह्यातून जात आहेत.आजही बीड जिल्ह्यातील लोक चांगले आहेत.बीड जिल्ह्यातील विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करीन असे प्रतिपादन भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी केले.

आष्टी शहरात भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा सरपंच परिषद व आष्टी तालुका पत्रकार संघाचे वतीने सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला.यावेळी सोशल मीडिया महाराष्ट्राचे



प्रमुख प्रकाश गाडे हे उपस्थित होते. यावेळी आष्टी तालुका पत्रकार मार्गदर्शक व सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,प्रा.डॉ. विनोद ढोबळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष सानप,शरद तळेकर,प्रवीण पोकळे,गणेश दळवी,शरद रेडेकर, भीमराव गुरव, सचिन रानडे, मनोज पोकळे, अविशांत कुमकर, शरद गर्जे यांच्यासह सरपंच परिषदेचे सरपंच सतीश ढवळे चिंचपूर हाजीपुरचे सरपंच शहाजी साप्ते सदस्य उपस्थित होते.


यावेळी पुढे बोलताना नवनाथ बन म्हणाले की,मी या जिल्ह्यामध्ये वाढलो.पत्रकारिता वक्तृत्व स्पर्धा माझ्या वक्तृत्वाला जी काही थोडीशी धार मिळाली ती या बीड जिल्ह्यामुळे मिळाली आणि बीड जिल्हा हे खरंच एक विद्यापीठ आहे माणूस घडवण्याचं चळवळ घडवण्याचं केंद्र कुठला असेल तर तो बीड जिल्हा आहे विनाकारण काही राजकीय लोकांनी काही लोकांनी जाणीवपूर्वक या बीड जिल्ह्याला बदनाम करण्याचा प्रयत्न केला पण बीड जिल्ह्यासारखे म्हणजे फणसांगी काटे आता अमृताचे साठे नारळावरती कठीण परिअंतरी जीवन ही जी म्हण आहे ती बीड जिल्ह्याला पूर्ण लागू होते बीड जिल्ह्याने अनेक माणसं घडवली दिग्गज माणसे घडवली ती राजकारणात असेल संत महंत असतील किंवा वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये असतील कवी असेल साहित्य असेल या सगळ्यातला एक मोठा वारसा या बीड जिल्ह्याला मिळालेला आहे आणि ही माझी कर्मभूमी आहे याचा मला खूप मनापासून आनंद आहे असेही नवनाथ बन म्हणाले.

# आर्याच्या जिद्द, संस्कार आणि स्वप्नांची झेप


## आर्या ढाकणेची यशोगाथा डॉक्टर होण्याच्या स्वप्नाकडे भक्कम पाऊल

## पांढरा कोट स्टेथोस्कोप आणि समाजसेवा करण्याचा प्रवास!

**विशेष वृत्तांकन - नितीन ढाकणे**



**वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांची पहिली पसंती विद्यार्थ्यांचे नंदनवन समजल्या जाणाऱ्या लातूर येथील राजश्री शाहू महाविद्यालयात परळीच्या आर्या अंगद ढाकणे हिने दिमाखात प्रवेश मिळवला आहे. १५ मार्च २०२६ रोजी झालेल्या CBSE स्क्रीनिंग टेस्टमध्ये आर्याने उत्तुंग यश संपादन करत PCB बॅचच्या पहिल्याच गुणवत्ता यादीत आपले स्थान पक्के केले आहे.**





### आर्याने डॉक्टरकीच्या दिशेने घेतलेली यशस्वी झेप

घेतली असेच म्हणावे लागेल. हे सर्व जिद्द, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर आहे. परळीची कन्या आर्या अंगद ढाकणे हिने वैद्यकीय क्षेत्रातील आपल्या स्वप्नांकडे पहिले भक्कम पाऊल टाकले आहे. लातूर येथील नामांकित राजश्री शाहू महाविद्यालयात प्रवेश निश्चित करून आर्याने आपल्या उज्वल भविष्याची मुहूर्तमेढ रोवली आहे.

दिनांक १५ मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या अत्यंत चुरशीच्या CBSE Screening Test मध्ये आर्याने घवघवीत यश संपादन केले. आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर तिने PCB (Physics, Chemistry, Biology) बॅचच्या पहिल्याच गुणवत्ता यादीत स्थान मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

### वैद्यकीय शिक्षणाचा कौटुंबिक वारसा-

आर्याच्या या यशामागे तिच्या कुटुंबातील शैक्षणिक वातावरणाचा मोठा वाटा आहे. तिचा मोठा भाऊ अनुज अंगद ढाकणे (२०२२ बॅच) हा सध्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ (ठाणे) येथे द्वितीय वर्षात वैद्यकीय शिक्षण घेत आहे. भावाच्या पावलावर पाऊल ठेवत आर्याने देखील 'डॉक्टर' होऊन समाजसेवा करण्याचे ध्येय उराशी बाळगले आहे.


### गुरुजनांचे मार्गदर्शन आणि संस्कारांची शिदोरी-

आर्याने आपले शालेय शिक्षण पोदार लर्न स्कूल आणि माउंट लिटरा झी स्कूल (परळी) येथून पूर्ण केले. तिच्या या यशात मार्गदर्शक कैलास घुगे सर, प्राचार्य आणि शिक्षक वृंदाचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### पालकांचे सुसंस्कार-

आर्याचे वडील अंगद ढाकणे आणि आई हे दोघेही व्यवसायाने शिक्षक आहेत. समाजात ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या या दांपत्याने आपल्या मुलांवर केवळ अभ्यासाचेच ओझे न टाकता, त्यांना ध्येय गाठण्यासाठी लागणारा संयम आणि संस्कार दिले आहेत. पालकांच्या मार्गदर्शनामुळेच अनुज आणि आर्या या दोन्ही भावंडांनी शैक्षणिक क्षेत्रात गरुडझेप घेतली आहे.

राजर्षी शाहू कॉलेजमधील प्रवेश हा आर्याच्या डॉक्टरकीच्या प्रवासातील एक मैलाचा दगड ठरला आहे. "मला एक उत्तम डॉक्टर बनून समाजातील तळागाळातील लोकांची सेवा करायची आहे," असा विश्वास आर्याने या निमित्ताने व्यक्त केला. तिच्या या यशाबद्दल परळी आणि लातूर परिसरातील मान्यवरांकडून, तसेच विविध संस्थांकडून तिचे अभिनंदन आणि कौतुक




होत आहे.

आर्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून तिचे कौतुक होत असून, आर्याची ही झेप केवळ एका प्रवेशापुरती मर्यादित नसून, ती एका ध्येयवेड्या प्रवासाची सुरुवात आहे. भविष्यात ती एक निष्णात डॉक्टर बनून रुग्णसेवा करेल, असा आम्हाला विश्वास आहे.

आर्याची ही यशाची परंपरा अशीच सुरू राहो. तिने घेतलेली ही झेप परळीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी आहे. तिला पुढील वाटचालीस उदंड शुभेच्छा!

# गाभ्यातला हलकल्लोळ : अस्वस्थतेतून करुणेकडे जाणारा एक अंतर्मुख प्रवास

आ मचे सन्मित्र वाल्मिक विष्णू वाघमारे यांचा आगामी काव्यसंग्रह ‘गाभ्यातला हलकल्लोळ’ हा केवळ कवितांचा संच नसून, एका जिवंत, झगडणाऱ्या आणि स्वतःचा अर्थ शोधणाऱ्या मनाचा प्रांजळ आविष्कार आहे. या संग्रहातील कविता वाचताना आपण एका कवीच्या अंतर्मनात डोकावतो—जिथे वेदना आहे, तुटलेपण आहे, प्रश्न आहेत; पण त्याचबरोबर शोध आहे, जाणीव आहे आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे करुणेची उब आहे.

या संग्रहातील मनोगत हे अत्यंत प्रामाणिक आणि अस्सल आहे. जीवनाच्या वाटेवर चालताना आलेल्या संघर्षांचा, अस्वस्थतेचा आणि स्वतःला शोधण्याच्या प्रक्रियेचा तो जणू निखळ स्वीकार आहे. डायरीच्या पानांवर उमटलेले अनुभव जेव्हा कवितेत रूपांतरित होतात, तेव्हा ते केवळ वैयक्तिक राहत नाहीत—ते सार्वत्रिक होतात. “कवितेमुळे जीवनाची समज वाढली” ही जाणीव या संपूर्ण संग्रहाचा गाभा ठरते.




या कवितांमध्ये वैयक्तिक वेदनेपासून सामाजिक जाणिवांपर्यंत आणि अस्तित्वाच्या प्रश्नांपासून करुणेच्या विस्तीर्ण आकाशापर्यंतचा प्रवास आहे. कवी स्वतःच्या दुःखात अडकून राहत नाही, तर तो इतरांच्या वेदनांशी नातं जोडतो. संतपरंपरेचा, विशेषतः करुणा आणि परपीडेची जाण जपणाऱ्या विचारांचा प्रभाव या कवितांना एक वेगळी उंची देतो.

भाषा साधी, पण परिणामकारक आहे. प्रतिमा नेमक्या आहेत आणि थेट अंतर्मनाला भिडतात. या कविता वाचताना त्या समजून घ्याव्या लागत नाहीत—त्या अनुभवाव्या लागतात. आणि म्हणूनच, हा संग्रह वाचकाला केवळ वाचक म्हणून ठेवत नाही, तर त्याला स्वतःच्या अंतरंगाशी संवाद साधायला भाग पाडतो.

‘गाभ्यातला हलकल्लोळ’ हा प्रत्येक त्या माणसासाठी आहे, ज्याने कधी ना कधी आतल्या आत तुटण्याचा अनुभव घेतला आहे आणि पुन्हा उभं राहण्याचा प्रयत्न केला आहे. हा संग्रह अस्वस्थतेला शब्द देतो आणि त्या शब्दांतून एक नवी शांतता शोधतो.

### प्रकाशनपूर्व विशेष आवाहन

या हृदयस्पर्शी आणि विचारप्रवर्तक काव्यसंग्रहाची प्रकाशनपूर्व प्रत (Pre-booking) आता उपलब्ध आहे. मराठी कवितेच्या या संवेदनशील आणि आशयघन प्रवासाचा भाग होण्यासाठी आजच आपली प्रत आरक्षित करा.

एक असा संग्रह, जो फक्त वाचला जाणार नाही—तर अनुभवला जाणार आहे.

आपली प्रत नक्की आरक्षित करा आणि या ‘हलकल्लोळा’चा साक्षीदार बना.

**गाभ्यातला हलकल्लोळ** - वाल्मिक विष्णू वाघमारे,
**प्रकाशन** - हस्ताक्षर प्रकाशन गृह, नांदेड,
**प्रकाशक:** डॉ.विनायक येवले,
**मुखपृष्ठ** - रघू नेवरे, नागपूर,
**शीर्षक** - गणेश विसपुते,
**रेखाटने** - दिनकर मनवर
**मांडणी** - मो. मुर्तुझा अथर
**पाठराखण** - आसाराम लोमटे, रणधीर शिंदे
**वितरण :** तुला ग्रंथ वितरण
+91 96379 04001
डॉ.सिद्धार्थ तायडे

# घाटकोपरमधील ट्रॅफिक,फेरीवाले व प्रदूषण समस्यांवर राष्ट्रवादी काँग्रेसची प्रशासनाकडे तातडीच्या कारवाईची मागणी



**घाटकोपर | केतन भोज**

घाटकोपर पूर्व व पश्चिम परिसरातील वाढत्या ट्रॅफिक कोंडी,अनधिकृत फेरीवाले आणि प्रदूषणाच्या समस्यांबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे घाटकोपर पश्चिम तालुका अध्यक्ष हिराचंद्र सूर्यवंशी यांनी एन विभाग कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्तांकडे लेखी निवेदन सादर केले आहे.पत्राच्या अनुषंगाने या समस्यांवर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.यावेळी निवेदन देताना मुंबई प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव नलावडे,ईशान्य मुंबई जिल्हाध्यक्ष सुरेश भालेराव,महिला जिल्हाध्यक्ष स्नेहा कुऱ्हाडे,घाटकोपर पश्चिम महिला तालुका अध्यक्ष कांचन बडे,सुनील चव्हाण,नंदू पाटील,सुरेश साखरे,विजय गोरे आदी उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,जागृती नगर मेट्रो ते श्रेयस सिग्नल दरम्यान मोठ्या प्रमाणात बस,ट्रक व टेम्पो यांची बेकायदेशीर पार्किंग होत असल्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होते.परिणामी नागरिकांना दोन-दोन तास ट्रॅफिकमध्ये अडकून राहावे लागत आहे.तसेच घाटकोपर बस डेपो ते श्रेयस सिग्नल या मार्गावर अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या कामांमुळे दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून,त्यात कोणतीही सुधारणा होत नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

घाटकोपर पश्चिम रेल्वे स्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात फेरीवाले बसत असल्याने रिक्षांचीही गर्दी वाढते आणि पादचाऱ्यांना चालण्यासाठी जागा उरत नाही,अशी समस्या स्थानिक नागरिकांनी मांडली आहे. याशिवाय,जगदूशानगर,श्रेयस,पंतनगर,गरोडिया नगर या भागात सुरू असलेल्या बांधकामांदरम्यान प्रदूषण नियंत्रणाचे नियम पाळले जात नसल्यामुळे हवेत धुळीचे प्रमाण वाढून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.तसेच घाटकोपर पश्चिममधील विविध रस्त्यांवर अनधिकृत फेरीवाल्यांचा वाढता अतिक्रमणाचा प्रश्नही गंभीर बनला असून,त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. सुरेश भालेराव जिल्हाध्यक्ष ईशान्य मुंबई यांनी प्रशासनाने या सर्व समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन नागरिकांना दिलासा द्यावा,अशी मागणी केली असून लवकरात लवकर ठोस उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# महावितरणने नियमितपणे ग्राहकांना बिले द्यावीत ; अन्यथा अंबाजोगाईकर वीज बिले भरणार नाहीत - डॉ.राजेश इंगोले यांचा इशारा



**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

महावितरण द्वारे अंबाजोगाई मध्ये विद्युत ग्राहकांकडून सक्तीने विज बिल वसुली सुरू आहे. वीज बिले न भरल्यास विद्युत ग्राहकांचे वीज कनेक्शन बंद करून त्यांना अंधारात ठेवण्यात येत आहे. वरवर पहाता ही कृती जरी नियमात बसणारी वाटत असली तरी सुद्धा अंबाजोगाई मध्ये ७० टक्के विद्युत ग्राहकांना नियमित बिले मिळत नसल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. त्यामुळे महावितरणने नियमितपणे ग्राहकांना बिले द्यावीत ; अन्यथा अंबाजोगाईकर वीज बिले भरणार नाहीत असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) चे नेते डॉ.राजेश इंगोले यांनी दिला आहे.

या संदर्भात जनतेला जाहीर आवाहन करताना व आमच्या प्रतिनिधीशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) चे नेते डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले आहे की, महावितरणची ही विद्युत बिले देण्याबाबतची अनियमितता ही बेकायदेशीर व नियमबाह्य आहे. त्यामुळे वाढीव बिलांवरील सक्तीची वसुली ही चुकीची आहे. विद्युत ग्राहकांना वीज बिले प्रत्येकमहिन्याच्या महिन्याला न दिल्यामुळे एकदाच चार ते पाच महिन्यांची बिले देण्यात आली आहेत. कुणाकुणाला तर तब्बल एक-एक वर्षाची बिले देण्यात आलेली आहेत. त्यामुळे सदरील वीज वापराचे युनिट्स अनेक पटीने वाढवून त्या युनिट वापराच्या हिशोबाने वाढीव दराने वीज बिल ग्राहकांच्या माथी मारण्यात आले आहेत. असे अनेक प्रकार अंबाजोगाई मध्ये घडले आहेत. या सर्व प्रकरणांची रितसर चौकशी करून वाढीव विद्युत बिले आलेल्या ग्राहकांना ही बिले तात्काळ कमी करून त्यांना योग्य ती बिले द्यावी अन्यथा महावितरण विज मंडळाच्या विरूद्ध विद्युत ग्राहकांचे आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा अंबाजोगाईचे सामाजिक कार्यकर्ते तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांनी महावितरणला दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे. नियमितपणे विद्युत बिले देणे हे महावितरणचे कर्तव्य आहे व वीज ग्राहकांचा अधिकार देखील आहे. महावितरणच्या बिल दिरंगाईमुळे अनेक विद्युत ग्राहकांना नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, तसेच वीज पुरवठा खंडित केल्यामुळे नाहक मनस्ताप होत आहे. त्यामुळे महावितरणच्या मुख्यअभियंत्यांनी या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. महावितरणच्या मुख्य अभियंत्यांनी तात्काळ या प्रकरणी तातडीची बैठक बोलावून यावर आवश्यक ती कार्यवाही करणे ग्राहकांचे हित जोपासण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.त्यामुळे त्यांनी विभागाची तातडीची बैठक बोलवावी अशी आग्रही भूमिका डॉ.इंगोले यांनी यावेळी घेतली. दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात इंगोले यांनी अंबाजोगाईतील अनेक मान्यवर प्रतिष्ठितांनी, दुकानदारांनी महावितरणच्या या भोंगळ कारभाराविषयी माझ्याकडे दूरध्वनी द्वारे तक्रारी केल्या आहेत. त्यापैकी अनेक तक्रारी मी वैयक्तिक पातळीवर वीज कर्मचाऱ्यांशी बोलून सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, दिवसेंदिवस या तक्रारी वाढतच आहेत. त्यामुळे याप्रकरणी धोरणात्मक निर्णय महावितरण वीज मंडळाने घेणे आवश्यक असल्याचे मत डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी व्यक्त केले. येणाऱ्या काही दिवसात जर या प्रकरणांचा निपटारा महावितरण द्वारे झाला नाही तर याप्रकरणी ग्राहक मंचात तक्रार करण्यातच येईल. परंतु, विद्युत ग्राहकांचे एक जनआंदोलन उभा करण्यात येईल असा इशारा डॉ.राजेश इंगोले यांनी महावितरणला दिलेल्या निवेदनातून केला आहे.

# स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव : दीपक रोकडे

## माणिकवाडी जिल्हा परिषद शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**शिराळा/ प्रतिनिधी**

स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत आहे. पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांचे कलागुण विकसित करणे, शिक्षक आणि समाजाची मोठी जबाबदारी आहे. त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सांगली जिल्हा शिक्षक संघाचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख दीपक रोकडे यांनी केले.

माणिकवाडी तालुका वाळवा येथील जिल्हा परिषद शाळेत स्नेहसंमेलन प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिक्षक संघाच्या केंद्रप्रमुख संघटनेचे राज्याचे कार्याध्यक्ष सुधाकर पाटील होते.



पेठ केंद्रप्रमुख सौ.कमल शिंदे यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सतीश जाधव यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांचा विविध सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. एन एम एम एस परीक्षेत यश संपादन केलेल्या सानिका मोहिते, समीक्षा खोत, वेदांत बल्लाळ, प्रज्वल शिंदे या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य देऊन सत्कार करण्यात आला.

स्वागत मुख्याध्यापक गोपीनाथ आडके यांनी केले. आभार दिलीप पाटील यांनी मानले. सूत्रसंचलन संजय सावंत यांनी केले.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन मदने, सरपंच वसंतराव शिंदे पाटील, सोसायटीचे चेअरमन तानाजी मोहिते, नाठवडेचे केंद्रप्रमुख अर्जुन कदम, शिक्षक नेते संजय काटे, शिक्षक पतसंस्थेचे संचालक वसंत शिंगारे, आप्पासाहेब जाधव, शिवाजी चव्हाण, युवराज कांदेकर, अधिक काटे, धनाजी पाटील, चंद्रकांत पाटील, विकास निंबाळकर, दिलीप खोत, स्नेहल जाधव, भारती माळी, मीरा शेंडगे, सुभाष खोत, सतीश मोहिते, सागर शिंदे, सचिन खोत काशिनाथ बल्लाळ, प्रतिभा खोत, अमृता नेसरेकर, स्वाती गिरीगोसावी, हणमंत भुरे उपस्थित होते.

# हिंदू मेळाव्यात सामाजिक मूल्यांचा जागर ; समरसता व पर्यावरण संवर्धनावर भर



**अंबाजोगाई (प्रतिनिधी):**

आज पार पडलेल्या हिंदू मेळाव्यात समरसता, कुटुंब प्रबोधन, स्वाबोध, पर्यावरण संवर्धन आणि नागरी कर्तव्ये या मूलभूत सामाजिक मूल्यांचा जागर करण्यात आला. या मेळाव्यात संतपरंपरेतील विचारांद्वारे समाजाला एकात्मतेचा आणि जबाबदारीचा संदेश देण्यात आला.

समरसता ही आपल्या संतपरंपरेची ओळख असल्याचे सांगताना संत ज्ञानेश्वर यांच्या "आता विश्वात्मके देवे, येणे वंदिले माझे" या वचनातून संपूर्ण विश्व एकच असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. तसेच संत तुकाराम यांच्या "जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले" या अभंगातून दुःखीजनांना आपले मानणे हीच खरी समरसता असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

कुटुंब प्रबोधनाच्या माध्यमातून संस्कारांची पेरणी महत्त्वाची असल्याचे सांगताना समर्थ रामदास यांनी दिलेला "सदाचार हा धर्माचा पाया" हा संदेश उद्धृत करण्यात आला. तसेच संत नामदेव यांच्या "देह देवाचे मंदिर" या विचारातून प्रत्येक व्यक्तीत देव पाहण्याची दृष्टी कुटुंबातूनच निर्माण होते, असे सांगण्यात आले.

स्वाबोधाच्या महत्त्वावर प्रकाश टाकताना स्वामी विवेकानंद यांच्या "उठा, जागे व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका" या विचारातून युवकांना प्रेरणा देण्यात आली. स्वाभिमान जागृत झाल्यास समाज प्रगतीपथावर जातो, असेही नमूद करण्यात आले.

पर्यावरण संवर्धनाच्या संदर्भात संत गाडगेबाबा यांच्या स्वच्छतेच्या संदेशाची आठवण करून देत स्वच्छ गाव, स्वच्छ समाज यावर भर देण्यात आला. वृक्षलागवड व पाणी संवर्धन ही काळाची गरज असल्याचेही सांगण्यात आले.

नागरी कर्तव्यांविषयी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या "शिक्षित व्हा, संघटित व्हा, संघर्ष करा" या संदेशातून कायद्याचा सन्मान, मतदानाचा अधिकार आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भाग जनसेवक गोविंद तांदळे (केज) आणि बिरूदेव सोन्नर महाराज यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# कासोळा येथे १ एप्रिलला 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'

## नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे – तहसीलदार अभय मस्के यांचे आवाहन

**महागाव :** महाराष्ट्र शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान – टप्पा १' अंतर्गत महागाव तालुक्यात मंडळनिहाय शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. याच मालिकेतील पुढील शिबिर बुधवार, दि. १ एप्रिल रोजी कासोळा येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित करण्यात आले आहे.

महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्यासाठी या शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून नागरिकांना 'सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी' अंतर्गत विविध सेवा एकाच दिवशी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.



शिबिरात प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, ७/१२ व ८-अ उताऱ्यांतील त्रुटी दूर करणे, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क तसेच डिजिटल उतारे तात्काळ उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जाणार आहे.

याशिवाय उत्पन्न, रहिवासी, जात व क्रीमीलेअर प्रमाणपत्रे, सामाजिक अर्थसहाय्य योजना, ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक, पीएम किसान तसेच तक्रार निवारण सेवा नागरिकांसाठी उपलब्ध राहणार आहेत. महाभूमी पोर्टलवरून डाउनलोड केलेल्या क्यूआर कोडयुक्त डिजिटल ७/१२ उताऱ्यास कायदेशीर वैधता असल्याबाबत शिबिरात मार्गदर्शन व प्रात्यक्षिकही देण्यात येणार आहे. कासोळा व परिसरातील नागरिकांनी या शिबिरात मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार अभय मस्के यांनी केले आहे.

# महात्मा फुले विकास महामंडळातील खाडे नामक कर्मचाऱ्याकडून लाभार्थ्यांची दिशाभूल



## बालासाहेब जगतकर

**परळी | प्रतिनिधी**

महात्मा फुले विकास महामंडळ बीड येथील खाडे नामक कर्मचाऱ्याकडून लाभार्थ्यांची दिशाभूल करण्यात आली असल्याची माहिती साप्ताहिक मानपत्र चे संपादक बालासाहेब जगतकर यांनी दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की काल दिनांक 30 मार्च 2026 रोजी महात्मा फुले विकास महामंडळ बीड कार्यालयात थेट कर्ज योजनेअंतर्गत लाभार्थी ऑनलाइन फॉर्म भरून ऑफलाइन फॉर्म भरण्यास गेले असता त्याच्या जवळील फाईल पाहून तुम्ही वयात बसत नाही चला निघा इथून असे उद्धटपणाचे बोलून लाभार्थी हाकलून देण्याचा प्रकार करण्यात आला. याचे कारण म्हणजे तुमचे वय 45 झाले आहे आता ही योजना देता येणार नाही परंतु महात्मा फुले विकास महामंडळाच्या अधिकृत वेबसाईटवर माहिती पुस्तक व शासनाच्या थेट कर्ज योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्यांचे वय 18 ते 55 असे असून लाभार्थ्यास तुमचे वय 45 झाले आहे. तुम्हाला कर्ज देता येणार नाही असे सांगून टाळाटाळ करण्यात येऊन सदरील लाभार्थ्यांची दिशाभूल करण्यात आली असून सदरील लाभार्थी विधवा व निराधार असल्याचे सांगितले असतानाही संबंधित खाडे नामक कर्मचाऱ्यांनी हाकलून दिले व लाभार्थ्यांची दिशाभूल केली म्हणून जिल्हाधिकारी यांनी तात्काळ या बाबीकडे लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे. अशी ही मागणी साप्ताहिक मानपत्रचे संपादक बालासाहेब जगतकर यांनी केली असून लवकरच त्यांची तक्रार महात्मा फुले विकास महामंडळ मुंबई व विभागीय आयुक्त औरंगाबाद इत्यादींना लेखी तक्रार करणार असल्याचेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# पोखरी ग्रामपंचायतीतर्फे श्री शैलेश साळवे यांचा भव्य सत्कार; पोलिस पाटीलपदी निवडीमुळे गावात आनंदाचे वातावरण

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

पोखरी गावाच्या कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची जबाबदारी असलेल्या पोलिस पाटीलपदी श्री शैलेश साळवे यांची निवड झाल्याने पोखरी गावात आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निवडीच्या निमित्ताने पोखरी ग्रामपंचायतीतर्फे त्यांचा भव्य व उत्साहात सत्कार करण्यात आला.

सत्कार समारंभात सरपंचश्रीहरी बाप्पा, ग्रामसेवक बलभीम गीते, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील मान्यवर व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी सर्वांनी श्री शैलेश साळवे यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील कार्यकाळासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात बोलताना उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, पोलिस पाटील ही गावाच्या सुरक्षिततेसाठी आणि शिस्त राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. श्री शैलेश साळवे हे जबाबदारीने, प्रामाणिकपणे व निष्ठेने आपले कर्तव्य पार पाडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गावातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली सकारात्मक बदल घडतील, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

ग्रामस्थांनी फुलांचे हार घालून व पुष्पगुच्छ देऊन साळवे यांचा सत्कार करत त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. संपूर्ण कार्यक्रमात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

यावेळी श्री शैलेश साळवे यांनी मिळालेल्या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, "गावाच्या हितासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी मी सदैव तत्पर राहीन. ग्रामस्थांच्या विश्वासाला पात्र ठरण्याचा पूर्ण प्रयत्न करेन," असे आश्वासन दिले.

या सत्कार समारंभामुळे गावात एकजूट आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, श्री शैलेश साळवे यांच्या निवडीमुळे पोखरी गावाच्या विकासाला आणि सुरक्षिततेला नवी दिशा मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.





दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

Last page

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# वंचित बहुजन आघाडीच्या लढ्याला मोठे यश 'राख' वाटपात मागासवर्गीयांना आता समान संधी!

■ परळी (प्रतिनिधी)

दाऊतपूर ग्रामपंचायतीकडून राख टेंडर प्रक्रियेत मागासवर्गीयांना जाणीवपूर्वक डावलून होणाऱ्या जातीय द्वेषाचा फुगा अखेर वंचित बहुजन आघाडीने फोडला आहे. परळी पंचायत समितीसमोर पुकारलेल्या आक्रमक उपोषणासमोर प्रशासनाला झुकावे लागले असून, यापुढे राख वाटपात सर्वांना समान संधी देण्याचे लेखी आश्वासन गटविकास अधिकाऱ्यांनी दिले आहे. या विजयानंतर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने उपोषण स्थगित करण्यात आले.

### नेमके प्रकरण काय ?

परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्रातून निघणारी राख दाऊतपूर ग्रामपंचायतीमार्फत वितरित केली जाते. मात्र, ग्रामपंचायतीने काही ठराविक लोकांनाच हाताशी धरून, प्रशासकीय अधिकाऱ्यांशी संगनमत करून कमी दरात राखेची उचल सुरू केली होती. यामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत असताना, गावातील मागासवर्गीय समाजाला या प्रक्रियेतून पूर्णपणे बाद करण्यात आले होते. या अन्यायाविरोधात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांच्या नेतृत्वाखाली ३० मार्च रोजी परळी पंचायत समितीवर धडक देण्यात आली.





### उपोषणातील प्रमुख मागण्यांची यादी

- दाऊतपूर ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असलेल्या सर्व स्टॉकधारकांची सविस्तर यादी जाहीर करावी.
- स्टॉकधारक ठरविण्यासाठी वापरले जाणारे निकष व नियमांची संपूर्ण माहिती सार्वजनिक करावी.
- ग्रामपंचायतीमार्फत आजपर्यंत कोणत्या एजन्सींना किंवा व्यक्तींना राख उचलण्यासाठी गेट पास पावत्या देण्यात आल्या, याचा संपूर्ण तपशील द्यावा.
- औष्णिक वीज निर्मिती केंद्राकडून ग्रामपंचायतीने किती मेट्रिक टन राख उचलण्यासाठी गेट पास घेतले आहेत, त्यापैकी किती वापरले गेले व किती शिल्लक आहेत, याची स्पष्ट माहिती द्यावी.
- दाऊतपूर ग्रामपंचायतीतील मागासवर्गीय वार्डमधील सदस्यांच्या नावे त्या प्रभागातील मागासवर्गीय नागरिकांना राख उचलण्यासाठी गेट पास पावत्या देण्यात याव्यात
- सकाळपासून सुरू असलेल्या या उपोषणाने प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली. अखेर सायंकाळी गटविकास अधिकारी भोसले यांनी लेखी पत्र देऊन, यापुढे राख वाटपात कोणताही भेदभाव होणार नाही आणि मागासवर्गीयांना समान संधी दिली जाईल, असे स्पष्ट केले.

### समर्थकांचा मोठा सहभाग

- या लढ्याला रिपाईचे राज्यसचिव भास्कर नाना रोडे, मराठवाडा उपाध्यक्ष प्रा. दासू वाघमारे, ज्येष्ठ नेते माधवराव ताटे, कामगार नेते आर. एच. वाव्हळे यांसह अनेक संघटनांनी जाहीर पाठिंबा दिला. उपोषणाला अंगद सुदाम बिडगर, राहुल दगडू भालेराव, सचिन रमेश हरभरे, अक्षय अर्जुन सुरवसे, संतोष वसंत व्हावळे, आकाश अश्रुबा मुंडे हे कार्यकर्ते बसले होते. हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी वंचितचे जिल्हा उपाध्यक्ष प्रसेनजित रोडे, तालुका अध्यक्ष गौतम साळवे, युवा अध्यक्ष राजेश सरवदे, धम्मानंद क्षीरसागर, ज्ञानेश्वर गीते, अविनाश मुंडे, शेख शाकेर अहमद यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी ताकद लावली होती.

> हा केवळ आमचा विजय नसून संविधानाने दिलेल्या समान हक्कांचा विजय आहे.
> — मिलिंद घाडगे (जिल्हा महासचिव, वंचित बहुजन आघाडी)

# सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेच्या माजलगाव तालुकाध्यक्षपदी सोहेल अत्तार यांची निवड

## सामाजिक कार्याला मिळणार नवे बळ

■ माजलगाव | प्रतिनिधी

सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेच्या माजलगाव तालुकाध्यक्षपदी सामाजिक कार्यात सक्रिय असलेले सोहेल अत्तार यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे तालुक्यातील युवकांना संघटित करून सामाजिक प्रश्नांवर अधिक प्रभावीपणे काम होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सोहेल अत्तार हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय असून, सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. विविध सामाजिक



आंदोलनांमध्ये सहभाग घेत त्यांनी माजलगाव परिसरात एक जबाबदार व कर्तव्यदक्ष कार्यकर्ते म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मा. अझरुद्दीन भाई सय्यद यांच्या मान्यतेने मराठवाडा अध्यक्ष मा. दानिश भाई कुरेशी यांनी त्यांची तालुकाध्यक्षपदी निवड जाहीर केली. संघटनेच्या बळकटीसाठी व युवकांना एकत्रित करण्यासाठी सोहेल अत्तार महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. दरम्यान, या निवडीचे शहरासह तालुकाभरातून स्वागत करण्यात येत असून विविध स्तरातून सोहेल अत्तार यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या माध्यमातून माजलगाव तालुक्यात सामाजिक प्रश्नांना अधिक वेगाने न्याय मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# देवळालीत भैरवनाथ यात्रोत्सवाला 2 एप्रिलपासून सुरुवात : कुस्त्यांचा भरणार जंगी आखाडा

■ कडा (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील देवळाली येथील जागृत देवस्थान भैरवनाथाचा यात्रोत्सव सालाबाद प्रमाणे याही वर्षी गुरुवार दि.२एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे भैरवनाथ यात्रोत्सवानिमित्त पैठण व नागतळा येथून गंगेचे पाणी आणण्यासाठी तरुण कावडी घेऊन जातात चैत्र पौर्णिमेला म्हणजेच हनुमान जयंतीच्या दिवशी भैरवनाथ यात्रेला सुरुवात होते नवसाला पावणारा व जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या देवळाली येथील भैरवनाथाच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी पंचक्रोशीतील भाविक येतात ढोल ताशाच्या गजरात पैठण व नागतळा येथून आणलेल्या गंगेच्या पाण्याच्या कावडींची मिरवणूक गावातून निघते नंतर कावडीने आणलेल्या पाण्याने भैरवनाथाला अभिषेक केला जातो आणि यात्रेला सुरुवात होते यात्रेनिमित्त घरोघरी आलेले पाहुणे आणि मित्र स्नेह भेटीची जणू आनंद पर्वणीच असते कावडीने पाणी आणण्यासाठी गेलेल्या भाविकांना येताना अमरापूर येथील चौधरी कुटुंब जेवणाची सोय करते भैरवनाथ मंदिरात गुळाची शेरनी आणि आंबील घुगर्याचा प्रसाद वाटप होतो बापू मियां यांच्या दारातून नवीन कापड गलप संदल घेऊन सर्व गावकरी पीर बाबाला गलप व चादर चढतात तेथून भैरवनाथ मंदिराकडे येतात आणि मंदिरासमोर ठेवलेल्या देवाच्या छबिना घोड्याला नवीन कापड फुलांचा हार आदी साहित्याने सजावट करून रात्री वाजत गाजत गावातून छबिण्याची



मिरवणूक निघते छबीना मिरवणुकीत लेझीम पथक ढोल पथक बँड पथक सहभागी होतात कावडी व छबिना मिरवणुकी मध्ये तरुणांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो भैरवनाथ मंदिरापासून ते चैतन्य स्वामी मंदिरासमोर येते स्वामीच्या मंदिराजवळ आल्यानंतर शोभेच्या फटाक्यांची अतिशय सुंदर नयनरम्य अशी आतिषबाजी होते दुसऱ्या दिवशी शुक्रवार ३एप्रिल रोजी हजर्याचा कार्यक्रम होणार आहे.



# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धामध्ये मातोश्री विद्यालयाची चमक

■ महागाव प्रतिनिधी

महागाव शहरातील शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन द्वारा आयोजित जिल्हा क्रीडा स्पर्धेमध्ये मातोश्री विद्यालय महागाव च्या विद्यार्थ्यांनी आपली चमक दाखवली वयोगट 14 - 17- 19 मुला मुलीच्या संघाने जिल्हास्तरावर विजय मिळून विभागीय खेळा साठी आपली निवड पक्की केली सदर खेळाडूंचे सर्वत्र कौतुक होत असून विद्यालयाचे संस्थापक दिगंबर जगताप यांनी खेळाडूंना शुभेच्छा देऊन पुढील कार्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या त्याचप्रमाणे विद्यालयाचे कर्मचारी वृंद व पालक वर्ग यांनी सुद्धा विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या

# आशा कार्यकर्त्या समाजाच्या आरोग्य सैनिक

## रेणापूर येथील "आशा" दिन कार्यक्रमात सौ. संजीवनीताई कराड यांचे प्रतिपादन

■ लातूर प्रतिनिधी

मनात कार्याचे धन असल्याने मानधनाकडे दुर्लक्ष करून कसलीही अशा आणि अपेक्षा न ठेवता अशा कार्यकर्तीचे कार्य कौतुकास्पद असून ज्या पद्धतीने सीमेवर सैनिक लढतात त्याप्रमाणे सामाजिक दुवा म्हणून आशा स्वयंसेविका खऱ्या अर्थाने आरोग्य सैनिक आहेत. त्यांच्या कार्यामुळेच ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्य सुरक्षित राहते असे प्रतिपादन भाजपा महिला आघाडीच्या सौ. संजीवनीताई रमेशअप्पा कराड यांनी केले. रेणापूर तालुका आरोग्य विभागाच्या वतीने आशा दिनानिमित्त २९ मार्च २०२६ रविवार रोजी रेणापूर येथील पंचायत समितीच्या सभागृहात सौ. संजीवनीताई कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत आशा स्वयंसेविकांचा गौरव सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमास रेणापूर पंचायत समितीच्या सभापती सौ. मोनिका रविंद्र सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, रेणापूरच्या नगराध्यक्षा श्रीमती शोभाताई आकनगिरे, जिल्हा परिषद सदस्य सौ. शिवकन्याताई गोडभरले, सौ. आशाताई भिसे, पंस सदस्य तात्याराव वाघमारे रेणापूर ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. अनिता अलगुले आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीधर रेड्डी यांच्यासह इतर अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, आयुष्यमान कार्ड यासह आरोग्य क्षेत्राशी निगडित व इतर बाबी मध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा स्वयंसेविकांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन कामाचा गौरव करण्यात आला. आशा दिनानिमित्ताने सामाजिक जनजागृती विषयी





रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. या कार्यक्रमात अनेक आशा स्वयंसेविकांनी आपल्या कार्याची माहिती मनोगतातून दिली. प्रारंभी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीधर रेड्डी यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विशद करून आशा स्वयंसेविकांच्या कार्याचे कौतुक केले.कोरोना काळात कोणी कोणाला भेटत नव्हते अत्यंत भयावह परिस्थिती असतानाही आशा स्वयंसेविकांनी घरोघरी जाऊन केलेले कार्य कदापी विसरता येणारे नाही असे सांगून यावेळी बोलताना सौ. संजीवनीताई कराड म्हणाल्या की, ग्रामीण भागातील गर्भवती महिलाची काळजी घ्यावी, त्यांना तपासणीसाठी प्रोत्साहित करावे, लसीकरणासाठी मदत, लहान मुलांच्या आरोग्याची देखरेख आणि शासकीय आरोग्याच्या योजना अशा स्वयंसेविकांनी लोकापर्यंत पोहोचण्याचे काम करावे.